# ती दिवाळी अजूनही आठवते, कॉम्रेड! – अजित सावंत

१९७१–७२ चा तो काळ होता. बालपण संपून किशोरावस्थेच्या उंबरठ्यावर मी उभा होतो. सभोवतालचे वातावरण समजून घेण्याचा माझा प्रयत्न असे. याच सुमारास, दळवी बिल्डींग सोडली तर परळ–लालबाग मधल्या चाळींवरचे लाल बावटे उतरुन 'भगवे' चढले होते. माझ्या चाळीवरचा लाल बावटा तर कॉ. कृष्णा देसाईंच्या खुनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीमधील शिवसेनेच्या विजयानिमित्त निघालेल्या मिरवणुकीमध्येच जाळला गेला होता. गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याऱ्या कॉम्रेडस्ची मुलेही हातात भगवा घेऊन, आवाज कुणाचा? ची आरोळी ठोकत गिरणगावातून छाती फुगवून फिरु लागली होती. माझ्या घरी मात्र, कॉ. अहिल्याताई रांगणेकर व कॉ. पी. के. कुरणेंपासून ते हिंदमाता थिएटरमधल्या कॉ. पेंटर सरमळकरांपर्यंत अनेकांचे जाणे–येणे सुरु असे. अशाच अनेक कॉम्रेडस्पैकी एक कॉ. सूर्यवंशी. पावसाळा सुरु झाला की, सूर्यवंशी आमच्याकडे हमखास येत. तसे महिन्यांतून २–३ वेळा आमच्या घरी त्यांच्या खेपा होत. पाऊस सुरु झाल्यावर ते रहात असलेल्या विक्रोळीच्या लाल डोंगरावर उगवणाऱ्या टाकळ्याच्या कोवळ्या पानांची भाजी मात्र आमच्या घरी ते न चुकता पोहोचवत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षामध्ये कॉम्रेड सूर्यवंशींसोबत काम करीत असताना, त्यांच्याशी घट्ट मैत्री झालेल्या माझ्या वडिलांसाठी – कॉ. पी. जी. सावंत यांच्यासाठी ही 'टाकळ्याची भाजी' म्हणजे मेजवानीच असे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र असलेल्या 'जीवन मार्ग' चे अंक, पक्षाचे सहानुभूतीदार असलेल्या वर्गणीदारांकडे नियमितपणे पोहोचविण्याचे काम कॉ. सूर्यवंशी व माझे वडिल 'अण्णा' करीत. पक्षाचे सभासद असलेल्या गिरणी कामगारांना, गिरणीच्या गेट वर भेटून पक्षाची वर्गणी घेणे, गिरण्यांच्या दरवाजावर भल्या पहाटे, पहिल्या पाळीच्या सुरुवातीसच काखेला मेगाफोन लावून पोहोचणे व तार स्वरामध्ये गेट मिटींगला जमणाऱ्या कामगारांसमोर गिरणी मालकांचे व व्यवस्थापनाचे वस्त्रहरण करणे ही कामे देखिल ते इमाने इतबारे करीत. त्या काळी त्यांना पक्षातून रु.३०–४० पर्यंत फूल टायमर म्हणून भत्ताही मिळत असे. चायना, बी. टी., डांगे, लेनिन व माओ हे शब्द त्यांच्या चर्चेमधून माझ्या कानांवर आदळत. कधी फारच खुशीत असलेले कॉ. सूर्यवंशी माझ्या वडिलांना विचारीत – कॉम्रेड कुठे आहे क्रांती? माझे वडील, पी. जी. त्यांना त्याच गंमतीदारपणे उत्तर देत – थोडं थांबा! क्रांती परळच्या नाक्यापर्यंत आली आहे! या दोघांची मैत्री देखिल विलक्षण होती. काही वर्षे, पक्ष कार्यकर्त्यांनी, स्वातंत्र्य सैनिकांना सरकारकडून मिळणारे मानधन स्वीकारु नये, अशी भूमिका घेणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने नंतर ही अट पक्षाच्या कनिष्ठ स्तरावरील कार्यकर्त्यांसाठी शिथिल केली. परिणामी कॉ. सूर्यवंशी व माझ्या वडिलांसारख्या कार्यकर्त्यांना, बऱ्याच खटपटी–लटपटी नंतर स्वातंत्र्य सैनिकांसाठीचे पेन्शन सुरु झाले. थोडे बरे दिवस आले. मला आठवतंय आम्ही रहात असलेल्या परळच्या त्या लहान खोलीमध्ये अण्णांनी पेन्शनच्या थकबाकी पोटी मिळालेल्या रकमेमधून, जेवण करण्यासाठीचा 'ओटा' बनवला. 'ईद' च्या दिवशी आम्ही ज्याच्या घरी मोठ्या उत्साहाने शिर खुरमा चाखण्यासाठी जात असू, त्या 'मिया चाचा' ची हे काम करताना मोठी लगबग सुरु होती. तो रहात असलेल्या कुर्ल्याच्या झोपडपट्टीतला त्याचा 'शेजारी' हे काम करण्यामध्ये तरबेज होता. गिरणीमध्ये साच्यावर

काम करता करता वडिलांशी दोस्ती झालेला मिया, आपल्या मित्राच्या घरचे हे मोठे काम होताना पाहून हरखून गेला होता. थोड्याच दिवसांनी, आईच्या सततच्या भुणभुणीला प्रतिसाद देत अण्णांनी घरी गॅस आणला. गॅसवरचा चहा कॉ. सूर्यवंशीच्या समोर करताच सूर्यवंशी मात्र काहीशा नाराजीनेच पुटपुटले, तुमचा आता "वर्ग" बदलला, तुम्ही बूर्झ्वा झालात! "बूर्झ्वा" या शब्दाचा अर्थ बराच शोधून मला पुढे काँग्रेसचे काम करु लागल्यावर फार उशिरा कळला तरी सूर्यवंशींच्या त्या विधानाने, अण्णा, कॉ.पी.जी मात्र, कुणीतरी शिवी दिल्यासारखे संतापले होते, हे मात्र माझ्या मनामध्ये पक्के ठसले.

ह्याच कॉ. सूर्यवंशीनी 'माझी एक दिवाळी मात्र अविस्मरणीय ठरविली. दसरा झाल्याला काही दिवस होऊन गेले होते. बरेचसे मध्यमवर्गिय, व कचेरीमधे कारकुनाची का होईना, बऱ्यापैकी पगाराची नोकरी करणाऱ्यांच्या घरातून दिवाळीची चाहूल लागली होती. ऑफीसमधून परत येताना हातांमध्ये गच्च भरलेल्या पिशव्या दिसू लागल्या होत्या. चाळीच्या लांब लचक पॅसेजमध्ये निरनिराळे खमंग वास दरवळू लागले होते. माझ्याच वयाची मुले, आणलेल्या फटाक्यांची यादी एकमेकांना सांगत, केपांची पिस्तुले उडवत चोर-पोलीस खेळण्याचा आनंद लुटत होती. तर मोठी मुले गॅलरीमधे एकाग्र चित्ताने कंदिलासाठी बांबू तासण्यामधे मग्न झाली होती. ओढ गस्तीने संसार रेटणाऱ्या माझ्या आईच्या नजरेमधे मात्र आपल्या मुला बाळांना नवे कपडे करावे की फराळ थोडा जास्त करावा ही चिंता दिसत होती. महापालिकेतली चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याची नोकरी करत, महिन्याच्या खर्चाचा ताळमेळ साधताना तिची आधीच तारांबळ उडत होती, त्यांत ही दिवाळी! दिवाळी येऊन ठेपली तरी घरी फटाके आणून देण्याचे चिन्ह दिसत नव्हते. मी खूपच वैतागलो होतो. माझी चिडचिड, धुसफूस यामुळे ती कावून गेली होती. चाळीच्या खाली, हातगाडीवर लाल-किल्ल्याचं चित्र असलेल्या लाल फटाक्यांच्या माळा, रुपयाला तीन च्या दरामधे मिळताहेत, ही खबर शेजारच्या संतोषने माझ्या कानांवर पोहोचविली होती. एव्हढे स्वस्त फटाके अण्णांनी माझ्याकरिता घेऊ नयेत याचा मला फारच राग आला होता. ऐन दिवाळीतल्या माझ्या 'शिमग्याने' संतापलेल्या अण्णांनी, माझ्या मांडीवर लाकडी फूटपट्टी ओढायला सुरुवात केली आणि तिसऱ्याच फटक्याला पट्टी तुटली. तुटलेल्या पट्टीचा तुकडा लागून, रक्ताळलेल्या ओरखडयाच्या झिणझिण्या मेंदूपर्यंत पोहोचल्या होत्या. फटाक्याच्या माळा नाहीत तर निदान केपांचे पिस्तुल, तेही नाही म्हणजे माझ्या दृष्टीने मोठाच अन्याय होता. परंतु जिथे घरखर्चाचा मेळ साधणे कठीण, तिथे फटाक्यांवर आणि पिस्तुलावर खर्च करायला पैसे आणणार कुठून? हा प्रश्न माझ्या बालबुध्दीला समजण्याच्या पलीकडचा होता. याच वेळी कॉ. सूर्यवंशी घरी आले. कळकट पांढरा लेंगा व त्या वर तसाच शर्ट, हातात जीवन मार्ग अंकांची पिशवी, डोळ्याला जाड भिंगांचा चष्मा खुरटलेल्या व पिकलेल्या दाढीचे खुंट, अशा अवतारामधल्या सूर्यवंशीना माझे वाईट वाटले असावे. केपांच्या पिस्तुलाची माझी मागणी मोठी नसावी अशी त्यांची कल्पना झाली असावी. चल, मी तुला पिस्तुल घेऊन देतो, म्हणत माझ्या वडिलांच्या, कॉ. पी. जीं.च्या रागाला न जुमानता, मला हाताला धरुन नेत ते तडक निघाले. दुकानामध्ये एका लोंबकळणाऱ्या दोरीला लटकवून ठेवलेल्या पिस्तुलांकडे पहात मी हरवून गेलो होतो. सूर्यवंशीनी

दुकानदाराला किंमत विचारली. "बारा आणे" दुकानदार म्हणाला. सूर्यवंशी विचार मग्न झाले. बहुधा त्यांच्या डोक्यामध्ये हिशेब चालला असावा. त्यांनी घासाघीस करण्याचा प्रयत्न केला परंतु दुकानदार दाद देत नव्हता. सरतेशेवटी दुकानदाराने दाखविलेल्या "प्लॅस्टिकच्या रॉकेट"कडे त्यांनी आपला मोर्चा वळवला. चांगल्या प्लॅस्टीकपासून बनविलेले आकर्षक रॉकेट चार आणे व थोड्या काळपट प्लॅस्टीकपासून बनविलेले रॉकेट – १५ पैसे असा दर दुकानदाराने सांगितला. रॉकेटचा वरचा स्प्रिंगवाला स्क्रू ओढून त्यांत केपा बसवून, दुकानदाराने रॉकेट हवेत फेकले. जमिनीवर पडताच त्यांतल्या केपा फुटून आवाज झाला. वा! खूपच भारी ! कॉ. सूर्यवंशी उद्‌गारले. पाच एक पैसे कमी होतात कां? यासाठी त्यांनी केलेल्या घासाघीशीला दुकानदार मात्र बधला नाही. हे चार आणे किंमतीचे रॉकेट घेऊ या, पिस्तुलापेक्षा हे चांगले आहे. पिस्तुल कसले? हातात घेऊन फिरावे लागते. हे लांबवर टाकता येते. कॉ. सूर्यवंशी मला पटविण्याचा प्रयत्न करीत होते. काहीच नसण्यापेक्षा निदान रॉकेट असणे मला चालले असते. मी सुध्दा कॉ. सूर्यवंशीना होकार दिला. सूर्यवंशीनी खिशातून काढलेल्या चिल्लर पैकी २५ पैसे दिले व रॉकेट माझ्या हातात दिले. वर १० पैसे देऊन केपांच्या गोल चपट्या डब्याही घेऊन दिल्या. डोळ्यावरचा चष्मा काढून पुसताना, सूर्यवंशीनी आपले डोळेही पुसले की काय? मला उगाचच वाटले. घरी पोहोचल्यावर, अण्णांनी कॉ. सूर्यवंशीना धारेवर धरले. कॉम्रेड, जाऊ द्या हो, मुलांनी दिवाळी साजरी करायची नाही, तर कुणी? सूर्यवंशी अण्णांना समजावत होते. मूल–बाळ नसलेल्या व साठी कधीच पार केलेल्या, कॉ. सूर्यवंशीना दिवस कसे काढावे लागत याची जाणीव त्यांच्या मित्राला, कॉ. पी. जी. ना होती. म्हणूनच त्यांनी हा खर्च विनाकारण केला असे त्यांचे म्हणणे होते. मी मात्र रॉकेट व केपा घेऊन, माझ्या मित्रांना दाखविण्यासाठी घरातून केंव्हाच सटकलो होतो. कॉ. सूर्यवंशीनी दिवाळीच्या आनंदाचा मोठा ठेवाच मला बहाल केला होता.

मधल्या काळामध्ये, कॉ. सूर्यवंशी गेले, अण्णा ही गेले, गिरणगांवही पार बदलला, आठवणी धूसर झाल्या. आज, उत्तुंग इमारतीच्या वरच्या मजल्यावरुन दिवाळीच्या दिवसांमध्ये झगमगलेली मुंबई पहाताना, कॉ. सूर्यवंशींची आठवण प्रकर्षाने येते. आपलेही दिवस किती बदलले याची जाणीव होते. परंतु घराच्या हॉलच्या खिडकीतून समोर पसरलेल्या धारावीच्या झोपडपट्टीतील दिवाळी पहाताना, तेथले दिवे मात्र, मिणमिणत रहाण्यासाठी फडफडत आहेत असे उगाचच वाटत रहाते.

**अजित सावंत**
(सरचिटणीस व प्रवक्ता, मुंबई कॉंग्रेस)

ajitsawant11@yahoo.com